रयत शिक्षण संस्थेचे,

# चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील व्यावसायिक व अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजनेसाठी अर्ज भरण्यासाठी नोटीस - सन २०२६-२७

**शासकीय वसतिगृह योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतीम दि. ३१/०८/२०२६**

०६.०८.२०२६

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सन २०२६-२७ साठी शासकीय वसतिगृह प्रवेश घेण्यासाठी ३१/०८/२०२६ हि अंतीम दिनांक आहे. ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या मा. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांचेकडील परिपत्रक वाचून पात्र विद्यार्थ्यांनी दि. ३१/०८/२०२६ अखेर आपला शासकीय वसतिगृह योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरावा तसेच पुढील माहितीसाठी संबंधित शासकीय वसतिगृहात जाऊन माहिती घ्यावी.

Chandraroop Dakale Jain College of Commerce, Shrirampur

प्राचार्य,
चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर.

सोबत : मा. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांचेकडील परिपत्रक

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईडवरदेखील टाकण्यात आलेली आहे

www.cdjcollege.com

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
कार्यालय :- सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण , अहिल्यानगर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, सावेडी नाका, अहिल्यानगर
दुरध्वनी क्रमांक -0241-2329378 इमेल :-asstdirobbw.nagar@gmail.com

जा.क्र./ससंइमाबक/वसतीगृह प्रवेश /बातमी/२०२६-२७/ 2083 दि.०६/०८/२०२६

प्रति,
प्राचार्य,
______________________
______________________
______________________

**विषय:-** राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह योजनेअंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कळविणे व सुचना फलकावर सदर वेळापत्रक प्रसिध्द करणे बाबत...

**संदर्भ:-** १. अवर सचिव, इमावक, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.वगृयो २०२५/प्र.क्र.११८/योजना-१, दि.२९/०७/२०२५
२. महा आयटी यांचेकडील ई-मेल दि.०३.०८.२०२६
3. मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय.म.रा. पुणे यांचे पत्र क्रं २०२६/ इमावबकसं शा.व. /वेळापत्रक/२०२६-२७/४४४५ दिनांक ०५/०८/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, योजना १२ वी नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येतात. या योजनेची प्रवेश प्रक्रिया Online राबविण्यासाठी वसतीगृह प्रवेश प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह, योजनेअंतर्गत रिक्त असलेल्या जागेवर व्यावसायिक व अव्यावसायिक विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु करण्यासाठी प्रवेशाचे वेळापत्रक आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना कळविणे व महाविद्यालयातील सुचना फलकावर वेळापत्रक प्रसिध्द करावे.

**(सोबत :- वेळापत्रक )**

(विनोद लोंढे)
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण,अहिल्यानगर

प्रतिलीपी :- माहितीस्तव सविनय सादर

**1) मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, संचालनालय, म.रा. पुणे-1**
**1) मा.प्रादेशिक उपसंचालक,इतर मागास बहुजन कल्याण विभाग (प्रादेशिक ),नाशिक**

(विनोद लोंढे)
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण,अहिल्यानगर

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
कार्यालय : सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, अहिल्यानगर
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, सावेडी नाका, अहिल्यानगर
दूरध्वनी क्रमांक -0241-2329378 इमेल :-asstdirobbw.nagar@gmail.com

जा.क्र./ससंइमाबक/वसतीगृह प्रवेश वेळापत्रक/२०२६-२७/ दि. ६/०८/२०२६

# शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ; ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (VJNT) आणि विशेष मागास प्रवर्ग (SBC) मधील इयत्ता १२ वी नंतर व्यावसायिक तसेच अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला असून, प्रवेशासाठीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत ऑनलाईन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत ओबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शासकीय वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांना घरबसल्या अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जाहीर करण्यात आलेले वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करण्याचा कालावधी | अर्ज छाननी करण्याचा कालावधी | पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिद्ध करणे | पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर प्रतीक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार दुसरी निवड यादी प्रसिद्ध करणे | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १२ वी नंतरच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या नवीन प्रवेशितांकरिता व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी | दिनांक ०७.०८.२०२६ ते ३१.०८.२०२६ | दिनांक ०१.०९.२०२६ ते ०७.०९.२०२६ | दिनांक ०८.०९.२०२६ | दिनांक १८.०९.२०२६ | दिनांक २१.०९.२०२६ | दिनांक ३०.०९.२०२६ |

अहिल्यानगर जिल्हयातील मुला / मुलींचे प्रवर्गनिहाय रिक्त जाग्यांची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र | वसतीगृहाचे नांव | प्रवर्ग | आरक्षण | व्यावसायीक | अव्यावसायिक | एकूण प्रवेशित | प्रवर्गनिहाय रिक्त जागा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | व्यावसायीक जागा | अव्यावसायीक जागा |
| १ | मुलांचे शासकीय वसतीगृह, अहिल्यानगर | इमाव | ५१ | २३ | ९ | ३२ | १३ | ६ |
| | | विजाभज | ३३ | २१ | ६ | २७ | २ | ४ |
| | | विमाप्र | ६ | ० | ० | ० | ४ | २ |
| | | दिव्यांग | ४ | ० | ० | ० | ३ | १ |
| | | अनाथ | २ | ० | ० | ० | १ | १ |
| | | आर्थिक मागास प्रवर्ग | ४ | ० | ० | ० | ३ | १ |
| | | एकूण | १०० | ४४ | १५ | ५९ | २६ | १५ |
| १ | मुलींचे शासकीय वसतीगृह, अहिल्यानगर | इमाव | ५१ | २९ | १ | ३० | ७ | १४ |
| | | विजाभज | ३३ | १९ | १० | २९ | ४ | ० |
| | | विमाप्र | ६ | १ | ० | १ | ३ | २ |
| | | दिव्यांग | ४ | ० | ० | ० | ३ | १ |
| | | अनाथ | २ | ० | ० | ० | १ | १ |
| | | आर्थिक मागास प्रवर्ग | ४ | १ | ० | १ | २ | १ |
| | | एकूण | १०० | ५० | ११ | ६१ | २० | १९ |

अहिल्यानगर जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना सूचना देण्यात येते की, महाविद्यालयांनी महाविद्यालयांच्या सूचना फलकावर वेळापत्रक प्रसिद्ध करणे, सोशल मीडियाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविणे तसेच इच्छुक विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांसह https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणेसाठी तात्काळ कार्यवाही करावी.

शासकीय वसतिगृह योजनेमुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सुरक्षित निवासाची सुविधा उपलब्ध होत असून, अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री.विनोद लोंढे, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, अहिल्यानगर यांनी केले आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज भरताना सर्व माहिती अचूक भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत, जेणेकरून प्रवेश प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.

(विनोद लोंढे)
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण,अहिल्यानगर